**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**मंगळवार दिनांक २० मे २०२५**

**ठळक बातम्या**

- **भारत लवकरच जागतिक स्तरावर सर्वात वेगाने वाढणारी स्टार्ट-अप इकोसिस्टम बनेल- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे 'स्टार्टअप कॉन्क्लेव्ह २०२५ मध्ये प्रतिपादन.**
- **वाशिम जिल्हयातील कारंजा येथे वरिष्ठस्तर दिवाणी न्यायालय स्थापन करण्याला राज्य मंत्रिमंडळाची मान्यता.**
- **राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते छगन भुजबळ यांनी घेतली मंत्रिपदाची शपथ.**
- **ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ जयंत नारळीकर यांचं  निधन.**

**आता सविस्तर बातम्या**

मुख्यमंत्री फडणवीस- स्टार्ट-अप

चीननंतर जगातील दुसऱ्या क्रमांकाची सर्वात वेगाने वाढणारी स्टार्ट-अप इकोसिस्टम म्हणून ओळखला जाणारा भारत लवकरच या क्षेत्रातील प्रतिभावान तरुणांच्या योगदानामुळे अव्वल स्थान पटकावेल असा विश्वास महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला.  एनएलसी, नीरी आणि एनआयओ यांच्या सहकार्याने आयोजित मुंबईत नेस्को इथं 'इनोव्हेशन, कोलॅबोरेशन, ट्रान्सफॉर्मेशन' या संकल्पनेवर आधारित दोन दिवसीय 'स्टार्टअप कॉन्क्लेव्ह २०२५' च्या उद्घाटन समारंभाला संबोधित करताना ते बोलत होते

***आज दुनिया की सबसे तेजी से बढ़ने वाली स्टार्टअप इकोसिस्टम चाइना के बाद भारत की है और जीस प्रकार से हमारे यंग एंड इनोवेटिव माईंड्स इनोवेशन कर रहे है, और उनमें से जिस प्रकार से स्टार्ट अप जन्म ले रहे है। वो समय दूर नहीं है। कि दुनिया की सबसे बड़ी स्टार्टअप इकोसिस्टिम ये हमारे भारत की होगी और एक बड़ा परिवर्तन ट्रान्सफॉर्मशन हम लोग लाएंगे।***

त्यांनी स्टार्ट-अप्सना पाठिंबा देण्यासाठी राज्य सरकारन हाती घेतलेल्या इनोव्हेशन सिटी आणि एज्युसिटीसारख्या उपक्रमांवर प्रकाश टाकला. महाराष्ट्र भारताची स्टार्ट-अप राजधानी म्हणून उदयास आला आहे, असे ते म्हणाले. या मेळाव्याला संबोधित करताना, विज्ञान आणि तंत्रज्ञान मंत्रालयाचे केंद्रीय राज्यमंत्री आणि सीएसआयआरचे उपाध्यक्ष डॉ. जितेंद्र सिंह यांनी सांगितले की भारतातील ४९% स्टार्ट-अप आता टियर-टू आणि टियर-थ्री शहरांमधून येतात, ज्यामुळे वाढत्या परिसंस्थेत ही शहरे किती महत्त्वाची भूमिका बजावतात यावर त्यांनी भर दिला.

गृहनिर्माण धोरण

राज्याचं नवीन गृहनिर्माण धोरण आज जाहीर झालं असून त्यासाठी ७० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक होणार आहे. मंत्रालयात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज हा निर्णय घेण्यात आला. 'माझे घर माझा अधिकार' या ब्रीदवाक्यासह हा कार्यक्रम राबवताना अल्प उत्पन्नधारक, ज्येष्ठ नागरिक, महिला, औद्योगिक कामगार आणि विद्यार्थी यांच्या विशिष्ट गरजांचा धोरणात विचार केला आहे.

इतवारी स्थानक

भारत सरकारच्या अमृत भारत स्टेशन योजने अंतर्गत सर्व सुविधा युक्त तयार करण्यात आलेल्या नेताजी सुभाष चंद्र बोस इतवारी स्थानकाचे लोकार्पण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते व्हिडिओ कॉन्फरसिंग द्वारे परवा अर्थात 22 मे रोजी करण्यात येणार आहे. दक्षिण पूर्व मध्य रेल्वेच्या नागपूर विभागातील चांदा फोर्ट, शीवनी, डोंगरगड, खामगाव आणि नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारीसह या स्थानकाचेही लोकार्पण होणार आहे अशी माहिती विभागीय रेल्वे व्यवस्थापक दिपक कुमार गुप्ता यांनी दिली.

***नागपुर मंडल के 15 स्टेशन देशभर के स्टेशनों में से चुने गए हैं, जिसका विकास नागपुर मंडल कर रहा है। इसमें पांच स्टेशन का जो काम पूरा हो गया है। जिसका उद्घाटन माननीय प्रधानमंत्री जी 22 मई को करेंगे इन पांच स्टेशनों में महाराष्ट्र के तीन बड़े स्टेशन हैं नागपुर का इतवारी, जो नेता जी सुभाष चंद्र बोस इतवारी स्टेशन जंक्शन के नाम से जाना जाता है। महाराष्ट्र का दूसरा स्टेशन है आम गांव गोंदिया के पास है गोंदिया जिले में और तीसरा है चांदाफोर्ट जो चंद्रपुर जिले के अंतर्गत है/***

देशभरातील १०३ रेल्वे स्थानकांना अत्याधुनिक सोयी सुविधांनी युक्त केले जात आहे. नेताजी सुभाषचंद्र बोस इतवारी रेल्वे स्टेशनवर आत आणि बाहेर जाण्यासाठी दोन वेगवेगळे रस्ते तयार करण्यात आलेले आहे. पार्किंग सुविधा देखील प्रशस्त करण्यात आलेली आहे.

दिवाणी न्यायालय

वाशिम जिल्ह्यातील कारंजा इथं वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायालय स्थापन करणे, त्यासाठीची आवश्यक पदं उपलब्ध करून देणे आणि येणाऱ्या खर्चास मान्यता, आज राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मंजुरी देण्यात आली. वाशिम जिल्ह्यातील कारंजा इथं दिवाणी न्यायालय स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव उच्च न्यायालयाकडून शासनास सादर करण्यात आला होता. या प्रस्तावास आज मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. या न्यायालयाकरिता 23 नियमित पदं आणि बाहय यंत्रणेद्वारे पाच पदांच्या सेवा उपलब्ध करून देण्यास मान्यता देण्यात आली. यापोटी येणाऱ्या एकूण रूपये 1 कोटी 76 लाख 42 हजार 816 इतक्या खर्चास मान्यता देण्यात आली. या न्यायालयासाठी वरिष्ठ स्तर दिवाणी न्यायाधीश-एक, अधीक्षक-एक, सहायक अधीक्षक-दोन, लघुलेखक श्रेणी-2-एक, वरिष्ठ लिपिक-तीन, कनिष्ठ लिपिक-नऊ, बेलीफ-तीन, शिपाई-तीन, पहारेकरी-एक, सफाईगार-एक अशा पदांना मान्यता देण्यात आली.

छगन भूजबळ

राष्ट्रवादी काँग्रेसचे आमदार छगन भुजबळ यांचा राज्य मंत्रिमंडळात समावेश करण्यात आला. राज्यपाल सी पी राधाकृष्णन यांनी भुजबळ यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांची याप्रसंगी उपस्थिती होती.

***मी छगन चंद्रभागा चंद्रकांत भुजबळ गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करतो की कायद्याद्वारे स्थापित झाल्या आहे, अशा भारताच्या संविधानाबद्दल मी खरी श्रद्धा व निष्ठा बाळगेन.मी भारताची सार्वभौमता व एकात्मता उन्नत राखेनं मी महाराष्ट्र राज्याचा मंत्री म्हणून माझी कामे निष्ठापूर्वक व सद्सद विवेक बुद्धीने पार पाडेन.***

उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी छगन भुजबळ यांचा मंत्रिमंडळात समावेश झाल्याबद्दल अभिनंदन केलं आहे. तर, छगन भुजबळ यांच्या अनुभवाचा लाभ राज्याला आणि त्यांना मिळणाऱ्या विभागाला होईल, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

नक्षल महिला अटक

अनेक हिंसक कारवायांमध्ये सहभागी राहिलेल्या ५ नक्षल महिलांना गडचिरोली पोलिस आणि केंद्रीय राखीव दलाच्या जवानांनी ताब्यात घेतले असून, यातील तिघींना अटक करण्यात आली आहे. भामरागड तालुक्यातील बिनागुंडा परिसरात ही कारवाई करण्यात आली आहे. या पाचही नक्षलींवर एकूण ३६ लाख रुपयांचे बक्षीस होत. उंगी मंगरु होयाम उर्फ सुमली, पल्लवी केसा मिडियम उर्फ बंडी आणि देवे कोसा पोडियाम उर्फ सविता अशी अटक झालेल्या नक्षलींची नावे असून,ते तिघीही छत्तीसगड राज्यातील बिजापूर जिल्ह्यातील रहिवासी आहेत. इतर दोन नक्षली अल्पवयीन असून, त्यांच्याबद्दल ठोस पुरावा नसल्याने त्यांना बाल न्याय मंडळापुढे हजर करण्यात येणार आहे.

जयंत नारळीकर-निधन

आंतरराष्ट्रीय कीर्तीचे ज्येष्ठ खगोल शास्त्रज्ञ आणि विज्ञान साहित्यिक जयंत नारळीकर यांचं आज पहाटे पुण्यात त्यांच्या राहत्या घरी निधन झालं. ते शहाऐंशी वर्षांचे होते. नारळीकर यांचं खगोल भौतिकी शास्त्रातलं कार्य जगभरात नावाजलं गेलेलं आहे. ब्रिटनमधल्या केंब्रिज इथून डॉक्टरेट आणि रँग्लर या प्रतिष्ठित पदव्या घेतल्यानंतर त्यांनी १९७२ मध्ये मुंबईत टाटा मूलभूत संशोधन संस्थेच्या खगोलशास्त्र विभाग प्रमुखपदाची जबाबदारी स्वीकारली. १९८८ साली त्यांची पुण्यातल्या आयुका या संस्थेचे संचालक म्हणून नियुक्ती झाली. नारळीकर यांना खगोलशास्त्रातल्या त्यांच्या कार्यासाठी टायसन मेडल तसंच स्मिथ पुरस्कार असे जागतिक पातळीवरचे सन्मान मिळाले होते. डॉक्टर जयंत नारळीकर यांनी जागतिक पातळीवर शास्त्रज्ञ म्हणून स्वत:चा वेगळा ठसा उमटवला. त्यांनी जगप्रसिद्ध शास्त्रज्ञ सर फ्रेड हॉएल यांच्यासमवेत ‘कन्फॉर्मल ग्रॅव्हिटी थिअरी’ मांडून जगभरातील शास्त्रज्ञांचं लक्ष वेधून घेतलं. खगोल क्षेत्रातील बहुमूल्य योगदानासाठी त्यांना ‘पद्मभूषण’ आणि ‘पद्मविभूषण’ हे सर्वोच्च सन्मान मिळाले आहेत. चौऱ्याण्णवाव्या अखिल भारतीय साहित्य संमेलनाचं अध्यक्षपद नारळीकर

यांनी भूषवलं होतं. विज्ञानप्रसारासाठी डॉक्टर नारळीकर यांनी अनेक माध्यमांचा वापर केला, त्यात त्यांच्या विज्ञान विषयक लिखाणाचा मोठा भाग आहे. चार नगरांतले माझे विश्व, या त्यांच्या आत्मचरित्राला साहित्य अकादमीचा तर, 'यक्षाची देणगी' या पुस्तकाला महाराष्ट्र सरकारचा पुरस्कार मिळाला असून, याशिवाय देशविदेशातल्या अन्य अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आलं आहे.

नारळीकर-निधन शोक संवेदना

नारळीकर यांच्या निधनाबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शोक व्यक्त केला. डॉक्टर जयंत नारळीकर यांच्या निधनामुळे राज्यात विविध क्षेत्रातून शोक व्यक्त होत आहे. देशाची विज्ञानाधिष्ठीत प्रतिमा उजळवणारा आणि खगोल शास्त्रातील महत्ता सिद्ध करणारा महान वैज्ञानिक सुपूत्र काळाच्या पडद्याआड गेला आहे, अशी शोकभावना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केली.

हवामान

आगामी काही तासात विदर्भातील बलढाणा, अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ आणि गडचिरोली जिल्ह्यांतील काही ठिकाणी विजांसह वादळी वाऱ्यासह हलक्यां ते मध्यम स्वरूपाचा पाऊस होण्याची शक्यता आहे. वर्धा, चंद्रपूर, नागपूर, भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यांतील देखील काही ठिकाणी विजांसह वादळी वाऱ्यासह पाऊस होण्याची शक्यता नागपूरच्या प्रादेशिक हवामान विभागाने वर्तवली आहे.

******